## अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०१ याची जबानी

**मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की :**

माझे नाव : श्रध्दा रविंद्र भांड
माझे वाय : २२ वर्षे,
व्यवसाय : शिक्षण
राहणार : जारकरवाडी, ता. आंबेगाव, जि,पुणे

## सरतपास अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्री. वाय. जे. चन्ने. यांचे मार्फत

**१.** मी आरोपींना ओळखतो. ते न्यायालयात हजर आहेत. घटना ९/७/२०१८ रोजी सांयकाळी ६ वाजता पारगाव येथे घडली. घटनेच्यावेळी काही झाले नाही. मी मंचर पोलीस ठाण्यात घटनेबाबात फिर्याद दिली होती. फिर्यादीवर माझी सही आहे. त्यातील मजकुर मला माहित नाही. सहीस **निशाणी ४०** देण्यात येते. असे काही घडले नाही की दि. ९/७/२०१८ रोजी आरोपीनीं मला व माझे पतीला मारहाण करून आमचे वाटोळे करतो असे शिवीगाळ दमदाटी दिली व आरोपी क्रमांक १ ने मला पाठीमागून मीठी मारून माझे मनास लज्जा उत्पन्न होइल असे वर्तन केले.

**(साक्षीदार सत्य लपवित असल्याचे कथन करून सहा. सरकारी अभियोक्ता यांनी त्यास उलट तपासणीचे स्वरूपात प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. पुरावा कायादा कलम १५४ अन्वये परवानगी दिली.)**

**२.** सरकारी वकीलांनी साक्षीदारास तीचे फिर्यादीतील अधोरेखांकीत भाग अ वाचून दाखविला. सदर बाब माझे फिर्यादीत का नमुद आहे याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की दि. ९/७/२०१८ रोजी आरोपीनीं मला व माझे पतीला मारहाण करून आमचे वाटोळे करतो असे शिवीगाळ दमदाटी दिली व आरोपी क्रमांक १ ने मला पाठीमागून मीठी मारून माझे मनास लज्जा उत्पन्न होइल असे वर्तन केले. हे म्हणणे खरे आहे की माझी व आरोपींची न्यायालयाबाहेर तडजोड झालेली

आहे. हे म्हणणे खरे नाही की तडजोड झाल्याने मी आरोपींना वाचविण्यासाठी मी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलट तपास आरोपीं तर्फे ॲड. ए. जी. पोखरकर यांचे मार्फत</u>**

उलट तपास नाकारला.

फेर तपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

दिनांक. २७/०३/२०१९

(भानुप्रताप चौहान)
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग
घोडेगाव. पुणे.